कालमर्यादा

जा.क्र .शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – १यांचे कार्यालय
दिनांक:- 27 JUL 2016 9६८८

प्रति

अध्यक्ष/सचिव
राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ,अम्फेनोल कंपनी समोर दत्त मंदिराच्या पाठीमागे लांडेवाडी भोसरी, पुणे – ४११०३९

विषय – सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन )अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत...

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन ) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र .१,६ व २४) २०१२
२.शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र -२००९ /(६६३ /०९)/माशि-१ दिनांक २० जून २०१२ .
३.शासन निर्णय एसएफएस-१०१६ /प्र.क्र.६९ /एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि.१७.०६.२०१६

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन ) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता, त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणे करीत/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्थीवर परवानगी दिलेली आहे .

| शासन यादी क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ सलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ९२० | पुणे | राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ,अम्फेनोल कंपनी समोर दत्त मंदिराच्या पाठीमागे लांडेवाडी भोसरी, पुणे – ४११०३९ | इंटेलिजंट कॅडेट इंटरनशनल स्कूल, प्लॉट नं.१ से.नं.३ भोसरी पुणे – ४११०२६ | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | २०१६-१७ |

अटी व शर्ती :-

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करून सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादापत्र) देण्यात येत आहे .

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिका-या कडे अर्ज करावेत.

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे . अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सादर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासननिर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

५. सीबीएसई,आयसीएसई, आयबी,आयजीएसीई आणि सीआयई इत्यादी मंडळांच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permisson) दिलेल्या संस्थानी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C)मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०)नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांच्याकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या सलग्नता ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C) मिळविणे साठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करून सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नितेसाठीसाल ना हरकत (N.O.C)प्रमाणपत्र देईल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा /दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपद्धतीचे तसेच महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२(सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यानी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System For Education)मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करून क्रमांक प्राप्त करून घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. या बाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याप्रमाणे संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे -१.

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१.मा.रा.ग.गुंजाळ, उप सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई – ३२
२.मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य , पुणे.

शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४ /मान्यता/पुवि/२०२३/१५०८
दिनांक : 07 FEB 2023

प्रति,

अध्यक्ष, / सचिव, ज्ञानदा मिशन ऑफ एज्युकेशन, लांडेवाडी,भोसरी,पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून इ. ६ वी ते इ. १० वी प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक दर्जावाढ करण्याकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मिळालेल्या शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.
ज्ञानदा मिशन ऑफ एज्युकेशन, लांडेवाडी,भोसरी,पुणे संचलित इंटेलिजंट कॅडेट इंटरनॅशनल स्कूल,सर्व्हे नं.७१५०,प्लॉट नं.१,सेक्टर नं.३,भोसरी,जि. पुणे.

संदर्भ : १ श्री.प्रदिप पडोळे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांचेकडील मान्यता पत्र जा.क्र. एसएफएस-१०२१/प्र.क्र. ३१३/एसएम-२, दि. ३.२.२०२३
२ सचिव, ज्ञानदा मिशन ऑफ एज्युकेशन, लांडेवाडी,भोसरी,पुणे यांचेकडील पत्र जा क्र ३६, दिनांक ६.२.२०२३

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत ज्ञानदा मिशन ऑफ एज्युकेशन, लांडेवाडी,भोसरी,पुणे संचलित इंटेलिजंट कॅडेट इंटरनॅशनल स्कूल, सर्व्हे नं.७१५०,प्लॉट नं.१,सेक्टर नं.३,भोसरी,जि. पुणे या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक, इ. ६ वी ते इ. १० वी इंग्रजी माध्यम सी.बी.एस.ई. संलग्नित दर्जावाढ शाळेस संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सदर दर्जावाढ करण्याकरिता मान्यता संदर्भीय क्र. १ चे आदेशातील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्तीस अधिन राहून देण्यांत आलेली आहे.

सदर अटी व शर्ती आपल्या संस्थेस/ शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(औदुंबर उकिरडे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा. अध्यक्ष,राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. मा. सदस्य सचिव, तथा मा.शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
३. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे